**सामान्य प्रशासन विभाग**

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १ सप्टेंबर २०१०.

## अधिसूचना

**भारताचे संविधान.**

क्रमांक सीडीआर.१०१०/प्र.क्र. २०/१०/११ :— भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३०९ च्या परंतुकाप्रमाणे प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करून महाराष्ट्राचे राज्यपाल, महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ मध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी याद्वारे पुढील प्रमाणे नियम करीत आहेत :—

१. या नियमांना महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) (तिसरी सुधारणा) नियम, २०१० असे म्हणण्यात यावे.

२. महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ च्या नियम ५ मध्ये, पोट-नियम (१) मधील खंड (सहा) ऐवजी पुढील मजकूर समाविष्ट करण्यात येईल :—

“ *(सहा)* शासकीय कर्मचा-यास शिक्षेच्या आदेशात विनिर्दिष्ट केलेल्या कालावधिसाठी तो ज्या वेतन समयश्रेणीमध्ये, पदावर श्रेणीमध्ये किंवा सेवेमध्ये असेल त्यापेक्षा खालच्या वेतन समयश्रेणीमध्ये, पदावर श्रेणीमध्ये किंवा सेवेमध्ये आणणे. ज्या वेतन समयश्रेणीतून, पदावरून, श्रेणीमधून किंवा सेवेतनू शासकीय कर्मचा-यास असे अवनत करण्यात आले असेल, त्या वेतन समयश्रेणीमधील, पदावरील, श्रेणीमधील किंवा सेवेतील बढतीस अशी अवनती अशा विर्निदिष्ट कालावधिसाठी रोधक ठरेल, अशा आदेशांमध्ये तो कालावधी समाप्त झाल्यावर शासकीय कर्मचा-यास पूर्वीच्या वेतन समयश्रेणीत, पदावर, श्रेणीमध्ये किंवा सेवेमध्ये परत आणण्यासंबंधीच्या पुढील अटींचा समावेश असावा :—

(अ) पदावनतीच्या विर्निर्दिष्ट कालावधिच्या परिणामी भावी काळातील वेतनवाढी पुढे ढकलल्या जातील किंवा कसे, व त्या कोणत्या मर्यादेपर्यंत, आणि,

(ब) शासकीय कर्मचा-यास त्याच्या वेतन समय श्रेणीमध्ये, पदावर, श्रेणीमध्ये किंवा सेवेमध्ये मूळ सेवाज्येष्ठता मिळेल किंवा कसे. ”.

महाराष्टाचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**जे. पी. डांगे,**
शासनाचे मुख्य सचिव.